**<u>फौ. कि. अर्ज क्र. ११२/२०२४ मधील अंतरीम खावटीच्या अर्जावरील आदेश</u>**

प्रस्तुत अर्ज, कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

**<u>अर्जदार हिचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u> –**

२. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह दि. ०३.०३.२०२० रोजी झालेला आहे. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांच्या कुटूंबात नांदावयास गेली. तिला सुरुवातीचे काही दिवस चांगले नांदवले. परंतू त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा दारु पिउन अर्जदार हिस मारहाण व शिविगाळ करीत होता. सदर लग्नसंबंधातून दि.०७.०९.२०२१ रोजी मुलगा झाला होता. तो गैरअर्जदार यांच्याकडे असतांना त्याचा मृत्यू झाला. त्याचे कारण समजू शकलेले नाही. गैरअर्जदार क्र.२ हा सासरा असून तो देखील दारु पिउन अर्जदार हिस शिविगाळ करीत होता व सोडून देण्यासाठी सांगत होता. दि.१८.११.२०२३ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने दारु पिउन अर्जदार हिस शिविगाळ करुन मारहाण केली. त्यामुळे अर्जदार हिस रात्रीच्या वेळी शेजारच्या घरामध्ये लपून राहणे भाग पडले. अर्जदार ही गैरअर्जदार यांच्या त्रासाला कंटाळून दि. १९.११.२०२३ पासून माहेरी राहत आहे. गैरअर्जदार क्र.१ हा मजुरी काम करुन दरमहा

रु. १५,०००/– कमावितो. त्यामुळे अर्जदार हिस औषधोपचार व प्राथमिक गरजेसाठी दरमहा रु. २,०००/– व घरखर्चासाठी रु. २,०००/– असे एकूण दरमहा रु. ४,०००/– प्रमाणे अंतरिम खावटी मंजूर करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. गैरअर्जदार यांनी आपला लेखी जबाब नि.क्र. १० वर सादर करुन लग्नसंबंध मान्य केले आहेत. परंतू असा आक्षेप घेतला आहे की, अर्जदार ही काही दिवस चांगली राहिली परंतू त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ याच्या आईवडिलांसोबत भांडण करीत होती. तसेच गैरअर्जदार क्र.१ यास अपमानित करीत होती. अर्जदार हीस वारंवार समजावून सांगूनही तिच्या स्वभावात फरक पडला नव्हता. दि.१९.११.२०२३ रोजी वडिलांना बोलावून घरातील सर्व कपडेलत्ते व दागीणे घेउन स्वतःच्या मर्जीने माहेरी निघून गेली आहे. अर्जदार ही स्वतःच्या मर्जीने माहेरी राहत असल्यामुळे खावटी मागण्यास पात्र नाही. गैरअर्जदार क्र.१ याने वेळोवेळी समेट घडवण्याचा प्रयत्न केला परंतू त्याचा कोणताही उपयोग झाला नाही. गैरअर्जदार क्र.१ याच्यावर आपल्या वृध्द आईवडिलांची जबाबदारी आहे. तसेच तो मजुरी काम करतो व दररोज रु. २००–३००/– कमवितो. परंतू कधी काम उपलब्ध असते कधी नसते. अर्जदार ही खावटी मिळण्यास पात्र नाही त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जदार हिचे अर्जातील कथन, गैरअर्जदार यांचा लेखी जबाब व अभिलेखावरील कागदपत्रावरुन खालील मुद्दे विचारार्थी उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिचा गैरअर्जदार यांनी कौटूंबीक छळ केल्याचे सकृतदर्शनी शाबीत केले आहे काय ? | **...होकारार्थी** |
| २. | अर्जदार हिने मागणी केल्याप्रमाणे गैरअर्जदारांकडून अंतरिम खावटी मिळणेस पात्र आहे काय ? | **...अंशतः होकारार्थी** |
| ३. | काय आदेश ? | **अंतिम आदेशानुसार.** |

## कारणमीमांसा

५. अर्जदार हिने आपल्या अर्जाच्या समर्थनात आधारकार्डची छायांकित प्रत, लग्नपत्रिकेची छायांकित प्रत, आंदण यादी छायांकित प्रत, वैद्यकिय प्रमाणपत्र छायांकित प्रत, जबानी रिपोर्ट छायांकित प्रत, आपसी समझोता छायांकित प्रत व गट क्र. १२/१ चा ७/१२ उतारा अभिलेखावर सादर केला आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांचा **रजनिशी – वि– नेहा, फौजदार अपील क्र. ७३०/२०२०** मधील निर्देशानुसार मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र निशाणी क्र.११ वर सादर केले आहे.

६. गैरअर्जदार यांनी आपल्या बचावामध्ये कोणतेही कागदपत्र सादर केलेले नाही. तसेच मालमत्ता व उत्तरदायित्वाचे शपथपत्र देखील सादर केलेले नाही.

७. अर्जदारातर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस.जी. कुळकर्णी यांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदार यांच्या विधिज्ञांना युक्तिवाद करण्याची संधी देवूनही युक्तिवाद केलेला नाही.

**मुद्दा क्र.१ ते ३ साठी –**

८. महिलांचा कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा, २००५ च्या कलम २० नुसार पिडीतग्रस्त महिलांना पोटगी देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. तसेच कलम २३ नुसार कलम २० मधील पोटगी ही अर्ज दाखल झाल्यानंतर मुख्य अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम स्वरुपात देण्याचा अधिकार देखील आहे. परंतु सदर पोटगी देण्यासाठी सामनेवालांनी अर्जदार हिचा मानसिक व शारीरिक छळ केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होणे आवश्यक आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्या कथनावरुन आपसातील नातेसंबंध मान्य असल्याचे स्पष्ट होते. तसेच अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ व २ हे सहभागी निवासस्थानामध्ये राहत होते व त्यांच्यामध्ये कौटूंबिक नातेसंबंध होते हे देखील मान्य असल्याचे स्पष्ट होते. त्यावरुन अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये कौटूंबिक नातेसंबंध असल्याचे शाबित होते.

९. अर्जदार हिच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र. १ व २ हे दारुच्या नशेमध्ये अर्जदार हिस शिविगाळ करीत होते. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा तिला मारहाण करीत होता. गैरअर्जदार क्र. २ हा अर्जदार हिस सोडून देण्याचे सांगत होता. दि.१८.११.२०२३ रोजी गैरअर्जदार क्र. १ याने दारु पिउन अर्जदार हिस मारहाण व शिविगाळ केली. त्यामुळे अर्जदार ही तेव्हापासून माहेरी राहत असल्याचे सांगीतले आहे. गैरअर्जदार यांनी आपल्या बचावामध्ये अर्जदार ही उध्दटपणे वागत होती, भांडण करीत होती व गैरअर्जदार क्र. १ यास अपमानित करीत होती. दि.१९.११.२०२३ रोजी वडिलांना बोलाउन माहेरी निघून गेल्याचा बचाव घेतला आहे. अर्जदार हिने केलेले आरोप जास्त गंभिर स्वरुपाचे असल्याचे स्पष्ट होते. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हिस नांदवण्याकरीता बराच प्रयत्न केला, अर्जदार हिच्या वडिलांनी त्याला घरातून हाकलून दिल्याचे देखील सांगीतले आहे. परंतू त्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला नाही. तसेच गैरअर्जदार क्र. १ याची नांदवण्याची इच्छा आहे तर त्याने अर्जदार हिस नांदवण्याकरीता नोटीस का पाठवली नाही किंवा त्याकरीता खटला का दाखल केला नाही असा प्रश्न निर्माण होतो. अर्जदार हिने सादर केलेल्या दि.२४.११.२०२३ रोजीच्या जबानी रिपोर्टवरुन आरोपीविरुध्द अंजनगांव सुर्जी पोलीस ठाण्यात तक्रार केल्याचे स्पष्ट होते. विनाकारण पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास

कोणतिही स्त्री पुढे येणार नाही. त्यामुळे गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा कौटूंबिक छळ केल्याचा प्रथमदर्शनी निष्कर्ष काढला जाउ शकतो.

१०. अर्जदार हिने स्वतःच्या उत्पन्नाबाबत अर्जात नमूद केलेले नाही. परंतू आपली मालमत्ता व उत्तरदायित्वाचे शपथपत्रामध्ये उत्पन्न नसल्याचे नमूद केले आहे. गैरअर्जदार यांच्यातर्फे अर्जदार हिस उत्पन्नाचे साधन असल्याबाबत कोणताही स्पष्ट आक्षेप घेण्यात आलेला नाही. त्यावरुन अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह चालविण्यास असमर्थ असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अर्जदार हिच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र. १ हा मजुरी काम करीत आहे. सदर बाब गैरअर्जदार क्र. १ याने कबुल केली आहे. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र. १ याचे दरमहा उत्पन्न रु. १५,०००/– असल्याचे नमूद केले आहे. परंतू गैरअर्जदार क्र. १ याने त्यास दररोज २००–३००/– रु. मजुरी मिळते. सदर मजुरीचे काम कधी उपलब्ध असते व कधी नसते असा बचाव घेतला आहे. सर्वसामान्यपणे मजुरीचे काम हे रोज उपलब्ध असेलच याची शाश्वती नसते हे विचारात घेणे आवश्यक आहे. तसेच गैरअर्जदार क्र. १ याने त्याच्यावर आपल्या वृध्द आईवडिलांची जबाबदारी असल्याचा बचाव घेतला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये गैरअर्जदार क्र. २ याचे वय ६० वर्षे नमूद करण्यात आले आहे. त्यावरुन गैरअर्जदार क्र. २ हा वयोवृध्द असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे प्रथमदर्शनी गैरअर्जदार क्र. १ याच्यावर आपल्या

वृध्द आईवडिलांची देखील जबाबदारी असल्याचे स्पष्ट होते. त्याचादेखील विचार खावटी मंजूर करतांना करणे आवश्यक ठरते. अर्जदारातर्फे गट क्र. १२/१ चा ७/१२ उतारा अभिलेखावर सादर केला आहे. सदर शेतमिळकत ही जयराम जोगी सावलकर याच्या नांवावर असल्याचे स्पष्ट होते. गैरअर्जदार क्र. २ याच्या नांवाचा विचार करता सदर शेतमिळकत ही गैरअर्जदार क्र. २ याच्या वडिलांच्या नांवे असल्याचा अंदाज लावला जाउ शकतो. परंतू त्यातून गैरअर्जदार क्र. १ यास उत्पन्न मिळत असल्याचा निष्कर्ष काढला जाउ शकत नाही.

**११.** अर्ज दाखल तारखेपासून गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. तसेच इतर कोणत्याही खटल्यामध्ये खावटी मंजूर झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदार ही अर्ज दाखल तारखेपासून खावटी मिळण्यास पात्र ठरते. गैरअर्जदार क्र. १ करीत असलेल्यामजुरी कामाचा व त्यावर असलेल्या आईवडीलांच्या जबाबदारीचा विचार करता त्याची अर्जदार हिस दरमहा रु. ३,०००/– प्रमाणे अंतरिम खावटी देण्याची ऐपत असल्याचा निष्कर्ष काढला जाउ शकतो. त्यामुळे मुददा क्र. १ यास होकारार्थी, मुददा क्र. २ यास अंशतः होकारार्थी व मुद्दा क्र. ३ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

# <u>आदेश</u>

अ) अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

ब) गैरअर्जदार क्र.१ याने अर्ज दाखल तारखे पासुन अर्जदार हिस दरमहा रुपये ३,०००/– प्रमाणे खटल्याचा अंतिम निकाल लागेपावेतो अंतरिम खावटी देण्याचा आदेश पारित करण्यात येतो.

क) अर्जाचा खर्च म्हणून गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हिस रु. ५००/– द्यावेत.

ड) आदेशाची एक प्रत अर्जदार हिस निशुःल्क देण्यात यावी.

ARIF HARUN SHAIKH

Digitally signed by ARIF HARUN SHAIKH
Date: 2026.07.27 16:32:12 +0530

(ए.एच.शेख)

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,

दिनांकः २७.०७.२०२६

(न्यायालय क्र. १) अकोट.

| **<u>C E R T I F I C A T E</u>** | |
|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Order/Judgment. | |
| Name of the Stenographer | Santosh S. Kale Gr-III |
| Court | Jt. Civil Judge (J.D.), Akot. |
| Date | 27.07.2026 |
| Judgment/Order signed by PO | 27.07.2026 |
| Judgment/Order uploaded on | 27.07.2026 |